Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. २९ जून २०२६ । वर्ष १ । अंक ८२ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

पहूर येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियानाला प्रारंभ

(पान २ वर)



## Selected

### मामुराबादमध्ये सोयाबीन पेरणीची लगबग

मामुराबाद | परिसरात समाधानकारक पावसाची हजेरी लागल्यानंतर मामुराबादसह परिसरातील शेतशिवारात खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग आला आहे. पावसामुळे अनुकूल वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून सोयाबीन पेरणीची लगबग सुरू झाली आहे. मामुराबाद येथील शेतकरी गिरीश नारखेडे यांनी आपल्या शेतात बैलांच्या साहाय्याने पारंपरिक पद्धतीने सोयाबीनची पेरणी करून पारंपरिक शेती संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला. आधुनिक यंत्रसामग्रीच्या युगातही बैलांच्या मदतीने करण्यात येणारी शेती परिसरातील नागरिकांसाठी आकर्षणाचा विषय ठरत आहे. सध्या पावसाच्या सरीमुळे जमिनीत योग्य ओलावा निर्माण झाल्याने शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. यंदा पावसाने वेळेवर हजेरी लावल्यामुळे चांगल्या उत्पादनाची आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## धाराशीवच्या सभेत उद्धव ठाकरेंचा शिंदे गटावर आणि बंडखोर खासदारांवर जोरदार हल्लाबोल

# 'मला वाटलं हा वाघ... पण निघाला लांडगा!'

## उद्धव ठाकरेंची ओमराजे निंबाळकरांवर घणाघाती टीका

**जन सम्राट टाईम्स**

**धाराशीव : शिवसेनेतील फुटीनंतर शिंदे गटात प्रवेश केलेल्या खासदारांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला. धाराशीव येथे झालेल्या जाहीर सभेत बोलताना त्यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत टीका करत, "मला वाटलं हा वाघ आहे; पण तो वाघाचे कातडे पांघरलेला लांडगा निघाला," अशी बोचरी टिप्पणी केली.**

सभेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ओमराजे निंबाळकर यांच्याविषयीची अनेक प्रकरणे आता समोर येत आहेत. ही माहिती पूर्वी असती, तर त्यांना उमेदवारीच दिली नसती. "मी त्यांना उमेदवारी दिली म्हणून तुम्ही त्यांना मतदान केले. जर मी उमेदवारी दिलीच नसती, तर ही वेळच आली नसती. त्यामुळे धाराशीवच्या जनतेची मी माफी मागतो," असे ते म्हणाले. ठाकरे यांनी पुढे सांगितले की, "एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवून पक्ष वाढवला, पण त्यानेच पक्षाशी गद्दारी केली. अशा व्यक्तींमुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. आज त्यांच्या एक-एक गोष्टी



समोर येत आहेत. असा माणूस आपण इतकी वर्षे कसा जपला, हा प्रश्न मला स्वतःलाच पडतो." गद्दारीच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी इतिहासातील खंडोजी खोपडे आणि सूर्याजी पिसाळ यांचा उल्लेख केला. "चारशे वर्षे झाली तरी त्या गद्दारांच्या नावावरील डाग पुसला गेला नाही. मग आज पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांच्या कपाळावरील डाग कसा पुसला जाणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. धाराशीवमधील राजकीय परिस्थितीचा उल्लेख करताना ठाकरे म्हणाले, "एका बाजूला कैलास आणि दुसऱ्या बाजूला ओमराजे असे दोन वाघ माझ्यासोबत आहेत, असा मला अभिमान वाटायचा. मात्र, ओमराजे हे वाघाचे कातडे पांघरलेला लांडगा होते, हे मला तेव्हा ओळखता आले नाही." शिवसेनेतील फुटीनंतर राज्यभरात बंडखोर खासदार आणि आमदारांच्या मतदारसंघांमध्ये उद्धव ठाकरे जाहीर सभा घेत आहेत. या सभांमधून ते पक्षत्याग करणाऱ्या नेत्यांवर टीका करत असून शिवसैनिकांशी थेट संवाद साधत आहेत. धाराशीवमधील सभेलाही मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि नागरिक उपस्थित होते. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी केलेल्या या टीकेमुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. विशेषतः ओमराजे निंबाळकर यांच्यावर केलेल्या वैयक्तिक आणि राजकीय आरोपांमुळे आता त्यांच्या प्रतिक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ठाकरे यांच्या आरोपांना ओमराजे निंबाळकर काय उत्तर देतात आणि या वादाला कोणते नवे वळण मिळते, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

### कपाळावरील डाग कसा पुसला जाणार?

आज त्यांच्या एक-एक गोष्टी समोर येत आहेत. असा माणूस आपण इतकी वर्षे कसा जपला, हा प्रश्न मला स्वतःलाच पडतो." गद्दारीच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी इतिहासातील खंडोजी खोपडे आणि सूर्याजी पिसाळ यांचा उल्लेख केला. "चारशे वर्षे झाली तरी त्या गद्दारांच्या नावावरील डाग पुसला गेला नाही. मग आज पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांच्या कपाळावरील डाग कसा पुसला जाणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. "एका बाजूला कैलास आणि दुसऱ्या बाजूला ओमराजे असे दोन वाघ माझ्यासोबत आहेत, असा मला अभिमान वाटायचा. मात्र, ओमराजे हे वाघाचे कातडे पांघरलेला लांडगा होते, हे मला तेव्हा ओळखता आले नाही." शिवसेनेतील फुटीनंतर राज्यभरात बंडखोर खासदार आणि आमदारांच्या मतदारसंघांमध्ये उद्धव ठाकरे जाहीर सभा घेत आहेत.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## पाळधीतून जिल्हाभर राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

### एकही बालक वंचित राहू नये' असे आवाहन



**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ रविवारी (दि. २८ जून) पाळधी येथे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते एका चिमुकल्या बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पाच वर्षांखालील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ लसीचे दोन थेंब पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, ही केवळ आरोग्य विभागाची नव्हे तर पालक आणि संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे." त्यांनी नागरिकांना शासनाच्या या लोकहिताच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. या प्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश झवर, डॉ. सायमा खान, लोकनियुक्त सरपंच बापूसाहेब विजय पाटील, ग्रामविकास अधिकारी दीपक पाठक, आरोग्य सहाय्यक अनिल महाजन व हितेश पाटील, आरोग्य सेवक अतुल नन्नवरे व प्रदीप अडकमोल, गटप्रवर्तक संगीता पाटील, चेतना पाटील तसेच आशा सेविका आणि आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


---

## प्रबोधन कट्टाच्या वतीने बदलापुरात छत्रपती शाहू महाराजांची जयंती उत्साहात

### शिक्षण आणि लोककल्याणकारी कार्याचा जागर; विविध मान्यवरांनी शाहू महाराजांच्या विचारांना उजाळा

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी:** प्रबोधन कट्टाच्या वतीने बदलापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान स्मारक येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक समता, शिक्षण, आरक्षण आणि लोककल्याणकारी धोरणांचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याला यावेळी अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यानंतर राजाराम खरात यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेत विविध मान्यवरांनी शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहितकारी कार्याचा



आढावा घेतला. सुभाष रणपिसे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रबोधन कट्टाच्या उपक्रमांचा धावता आढावा सादर केला. अमोल जगधने यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून शाहू महाराजांचा जीवनपट उलगडला. साहित्यिक प्रा. अनिल भालेराव यांनी शाहू महाराज हे रयतेची काळजी घेणारे लोकहितदक्ष आणि दूरदृष्टीचे शासक होते, असे सांगत त्यांच्या कार्याचा गौरव केला. आंबेडकरी विचारवंत व लेखक विनायक आढांगळे यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. तसेच बौद्धाचार्य अशोक गजरमल, पांडुरंग वाव्हळ आणि मिलिंद सकपाळ यांनीही मनोगत व्यक्त करून उपस्थितांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान संजय काळेवाघ आणि पुष्पाताई शिंदे यांनी गीत सादर केले. सामुदायिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपस्थितांना पेढ्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन स्वप्निल शिर्के (भाऊ) यांनी केले. या कार्यक्रमास आर.पी.आय. (आर. के.) पक्षाचे पदाधिकारी, सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यानंतर राजाराम खरात यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेत विविध मान्यवरांनी शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहितकारी कार्याचा आढावा घेतला. सुभाष रणपिसे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रबोधन कट्टाच्या उपक्रमांचा धावता आढावा सादर केला.

---

## धरणगावात पल्स पोलिओ मोहीम उत्साहात; २१ बुथच्या माध्यमातून बालकांना लसीकरण

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी :** स्थानिक ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने रविवारी (दि. २८ जून २०२६) धरणगाव शहरात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात आणि प्रभावीपणे राबविण्यात आली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण आणि ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेचे नियोजन करण्यात आले. शहरातील प्रत्येक भागातील बालकांपर्यंत पोलिओची लस पोहोचविण्यासाठी




एकूण २१ पोलिओ लसीकरण बुथ उभारण्यात आले होते. या मोहिमेत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना 'दोन थेंब जीवनाचे' देऊन पोलिओपासून संरक्षण करण्यात आले. सकाळी आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांच्या उपस्थितीत मोहिमेचा शुभारंभ झाला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक साळुंखे यांनी विविध लसीकरण केंद्रांना भेट देत कामकाजाची पाहणी केली तसेच कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी डॉ. साळुंखे यांनी पालकांना आवाहन करत सांगितले की, "पोलिओ निर्मूलनासाठी प्रत्येक बालकाला वेळेवर लस देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. धरणगावकरांनी या मोहिमेला नेहमीप्रमाणे उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये." आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे ही मोहीम यशस्वीपणे पार पडली.

---

## धुळे जिल्ह्यात पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ!

### जिल्हाधिकाऱ्यांचे पालकांना आवाहन



**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे येथील जिल्हा व महिला रुग्णालयात रविवार, दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते धन्वंतरी प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, उपसंचालक (मुंबई शहर) डॉ. प्रसाद भंडारी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महेश भडांगे, महिला व बाल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अश्विनी भामरे, डॉ. स्वप्नील पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक जाधव, डॉ. समीर शेख, डॉ. गीतांजली सोनवणे, प्रशासकीय अधिकारी राकेश भावसार, कार्यालय अधीक्षक खंडू ईशी, बाह्यरुग्ण विभाग परिसेविका प्रतिभा घोडके, अनुपमा लोंढे, मीना गढरे, परिचारिका प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य भूषण जोशी, कमलेश परदेशी, अमरजीत पवार, वैभव भोसले तसेच आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि परिचारिका प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी जिल्ह्यातील सर्व पालकांना आवाहन करताना सांगितले की, पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजणे अत्यंत आवश्यक आहे. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी सर्व पालकांनी पुढाकार घ्यावा आणि राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला सहकार्य करावे. आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हाभरात विविध लसीकरण केंद्रांवर ही मोहीम राबविण्यात येत असून, पोलिओमुक्त समाज घडविण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते धन्वंतरी प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, उपसंचालक (मुंबई शहर) डॉ. प्रसाद भंडारी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महेश भडांगे, महिला व बाल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अश्विनी भामरे, डॉ. स्वप्नील पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक जाधव, डॉ. समीर शेख, डॉ. गीतांजली सोनवणे, प्रशासकीय अधिकारी राकेश भावसार, कार्यालय अधीक्षक खंडू ईशी, बाह्यरुग्ण विभाग परिसेविका आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि परिचारिका प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी जिल्ह्यातील सर्व पालकांना आवाहन करताना सांगितले की, पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजणे अत्यंत आवश्यक आहे.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## धुळे शहरात शाहू महाराज जयंतीनिमित्त भव्य बाईक रॅली उत्साहात

### सामाजिक समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश; धुळेकरांचा उत्स्फूर्त सहभाग

**जन सम्राट टाईम्स**



**धुळे | प्रतिनिधी :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त धुळे शहरात शुक्रवारी (दि. २६ जून) सकाळी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. संघर्षपती एक राष्ट्रशक्ती अभियान यांच्या वतीने आयोजित या रॅलीत युवक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. रॅलीची सुरुवात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (एस.टी. स्टँड परिसर) येथून करण्यात आली. त्यानंतर देवपूर परिसर, नवीन महापालिका, जुनी महापालिका, पारोळा रोड आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत राजर्षी शाहू महाराज नाट्य मंदिर येथे रॅलीची सांगता झाली. यावेळी सहभागी नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश दिला. रॅलीदरम्यान आयोजकांनी सर्व वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी होण्याचे आवाहन केले होते. नागरिकांनीही त्यास सकारात्मक प्रतिसाद देत शांततेत आणि शिस्तीत रॅली यशस्वी केली. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी तसेच समाजात एकात्मता आणि सामाजिक सलोखा दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित या बाईक रॅलीला धुळेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त धुळे शहरात शुक्रवारी (दि. २६ जून) सकाळी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

संघर्षपती एक राष्ट्रशक्ती अभियान यांच्या वतीने आयोजित या रॅलीत युवक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. रॅलीची सुरुवात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (एस.टी. स्टँड परिसर) येथून करण्यात आली. त्यानंतर देवपूर परिसर, नवीन महापालिका, जुनी महापालिका, पारोळा रोड आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत राजर्षी शाहू महाराज नाट्य मंदिर येथे रॅलीची सांगता झाली. यावेळी सहभागी नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश दिला. रॅलीदरम्यान आयोजकांनी सर्व वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी होण्याचे आवाहन केले होते.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा विरोध!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना घेराव घालून निवेदन

जन सम्राट टाईम्स



**जळगाव :** अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शवत राष्ट्रीय चर्मकार महासंघ, जळगाव जिल्हा यांच्या वतीने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना घेराव घालून निवेदन देण्यात आले. महासंघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारताच्या राज्यघटनेने अनुसूचित जातींना समान अधिकार व संरक्षण दिले असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाचा विषय चर्चेत आला आहे.

मात्र, महाराष्ट्र शासनाने राज्यात अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण लागू करू नये, अशी महासंघाची ठाम भूमिका आहे. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जाती समाजात फूट पडण्याची शक्यता असून सामाजिक ऐक्याला धक्का बसू शकतो. त्यामुळे शासनाने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित समाजघटकांशी सविस्तर चर्चा करून समाजहिताचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री आणि राज्य मंत्रिमंडळाने समाजाच्या भावना लक्षात घेऊन महाराष्ट्रात उपवर्गीकरण लागू न करण्याचा निर्णय घ्यावा आणि अनुसूचित जाती समाजाला न्याय द्यावा, अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली.यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे, जिल्हाध्यक्ष गणेश माधव सुरवाडे, महानगराध्यक्ष भगवान बाविस्कर, युवक जिल्हाध्यक्ष दीपक अनुष्ठान, तालुकाध्यक्ष दयाराम मोरे, आनंद नेरकर, रतिलाल मोरे, राजेंद्र चित्ते, नारायण वाघ, सुनील विसावे, रवींद्र अहिरे, धर्मराज मोरे, संजय बंसी, धरणगाव तालुकाध्यक्ष दिलीप वाघ, अरुण नेरकर, रमाकांत नेरकर, पंकज खजुरे, संतोष वाघ, कल्पेश विसावे, मंगावसईकर, भिकन क्षीरसागर, मयूर शिरसागर यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होतेनिवेदनावर उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन ते शासनाकडे सादर करण्यात आले.

### सामाजिक ऐक्याला बसू शकतो धक्का

▌अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शवत राष्ट्रीय चर्मकार महासंघ, जळगाव जिल्हा यांच्या वतीने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना घेराव घालून निवेदन देण्यात आले. महासंघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारताच्या राज्यघटनेने अनुसूचित जातींना समान अधिकार व संरक्षण दिले असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाचा विषय चर्चेत आला आहे. सामाजिक ऐक्याला धक्का बसू शकतो. त्यामुळे शासनाने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित समाजघटकांशी सविस्तर चर्चा करून समाजहिताचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

# पहूर येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियानाला प्रारंभ

## नागरिकांना सक्रिय सहभागाचे आवाहन

जन सम्राट टाईम्स



**पहूर, ता. जामनेर । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, पहूर यांच्या वतीने पहूर बसस्थानक व ग्रामपंचायत परिसरात ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे 'दोन थेंब जीवनाचे' पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. पोलिओमुक्त आणि निरोगी भारत घडविण्याच्या उद्देशाने आयोजित या मोहिमेत प्रत्येक बालकापर्यंत पोलिओची लस पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी पालकांना आपल्या मुलांचे वेळेत लसीकरण करून या जनहिताच्या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. या प्रसंगी सरपंच पती शंकर जाधव, उपसरपंच राजू जाधव, माजी प्रशासक रामचंद्र वानखेडे, चेतन रोकडे, ग्रामपंचायत सदस्य, औषध निर्माण अधिकारी मनीष जाधव, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपसरपंच राजू जाधव आणि माजी प्रशासनक रामचंद्र वानखेडे यांनी पालकांना संबोधित करत सांगितले की, "० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये. प्रत्येक पालकाने जागरूक राहून आपल्या पाल्याला पोलिओचे दोन थेंब पाजावेत. निरोगी समाजासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे." अभियानाच्या माध्यमातून 'पोलिओमुक्त महाराष्ट्र' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याशी खेळ?

## सुरक्षा किटच्या अभावाचा आरोप




जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी :** नशिराबाद शहरात स्वच्छता मोहिमेचा गाजावाजा होत असताना घंटागाडीवर कार्यरत काही सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध नसल्याचा आरोप पुढे आला आहे. नुकत्याच समोर आलेल्या छायाचित्रांमध्ये एका कर्मचाऱ्याकडे हातमोजे व सुरक्षित गमबूट नसल्याचे दिसत असल्याचा दावा करण्यात आला असून, या प्रकारामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. राम पेठ चौक परिसरात कचरा संकलन करताना संबंधित कर्मचारी कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय काम करत असल्याचे छायाचित्रांवरून दिसत असल्याचा आरोप आहे. दररोज ओला-सुका कचरा, काचा आणि इतर टाकाऊ वस्तू हाताळताना अशा कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार कचरा संकलन व हाताळणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यक वैयक्तिक सुरक्षा साधने (PPE) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था अथवा नियुक्त ठेकेदाराची असते. तसेच कामगारांच्या सुरक्षिततेबाबत इतर संबंधित कायदे व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे अपेक्षित आहे. जर कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदारामार्फत होत असेल, तर सुरक्षा साधने पुरविण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित ठेकेदारावर असते. त्याचबरोबर करारातील अटींची अंमलबजावणी आणि नियमांचे पालन होत आहे की नाही, यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी नगर परिषदेची असते. सुरक्षा साधनांच्या अभावामुळे सफाई कर्मचाऱ्यांना संसर्गजन्य आजार किंवा अपघाताचा धोका वाढू शकतो, अशी भीती व्यक्त करत नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

### जबाबदारी कोणाची?

सर्व सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा किट तातडीने उपलब्ध करून देण्यात यावीत आणि नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधितांवर योग्य कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.नशिराबाद नगर परिषद किंवा संबंधित ठेकेदाराची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. दररोज ओला-सुका कचरा, काचा आणि इतर टाकाऊ वस्तू हाताळताना अशा कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली.

# नरडाणा रेल्वे स्थानकावर तत्काळ तिकीट बुकिंग सेवेला ब्रेक!

जन सम्राट टाईम्स

**बेटावद । प्रतिनिधी :** रेल्वेने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी तत्काळ तिकीट सेवा ही ऐनवेळच्या प्रवासाची मोठी सोय मानली जाते. मात्र, बेटावद व परिसरातील प्रवाशांना गेल्या दोन ते तीन दिवसांपासून नरडाणा रेल्वे स्थानकावरील आरक्षण केंद्रात गंभीर तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तत्काळ तिकीट बुकिंगच्या महत्त्वाच्या वेळेत रेल्वेचा सर्व्हर वारंवार डाऊन होत असल्याने प्रवाशांना तिकीट मिळणे कठीण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बेटावद परिसरातील अनेक प्रवासी न्यू कुचबिहार (NCB) तसेच इतर लांब पल्ल्याच्या गाड्यांचे तत्काळ आरक्षण करण्यासाठी सकाळीच नरडाणा रेल्वे स्थानकावर गर्दी करतात. मात्र, तत्काळ बुकिंग सुरू होताच इंटरनेट नेटवर्कमध्ये तांत्रिक बिघाड निर्माण होतो. परिणामी, बुकिंग प्रक्रिया अर्धवट राहते किंवा व्यवहार पूर्ण न झाल्याने तिकीट रद्द होते. या समस्येमुळे अनेक प्रवाशांना सलग दोन ते तीन दिवस नरडाणा रेल्वे स्थानकाच्या चकरा माराव्या लागत आहेत. लांबून येणाऱ्या प्रवाशांचा प्रवास खर्च वाढत असून, वेळ आणि पैशांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे. तातडीच्या प्रवासाचे नियोजनही विस्कळीत होत असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बेटावद येथील प्रवासी रहीम पठाण यांनी सांगितले कीप्रत्येकवेळी नेटवर्कची समस्या निर्माण होत आहे. रेल्वे प्रशासनाच्या या ढिसाळ व्यवस्थेमुळे आमचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहेत." रेल्वे प्रशासनाच्या डिजिटल सुविधांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत प्रवाशांनी तत्काळ तिकीट बुकिंगच्या मुख्य वेळेतच सर्व्हर डाऊन होण्याचे कारण शोधून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# न्यूझीलंडच्या तीन दिग्गज क्रिकेटपटूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटला भावनिक निरोप

## सोफी डिवाइन आणि ली ताहुहू यांच्या शानदार कारकिर्दीचा समारोप

जन सम्राट टाईम्स




**नवी दिल्ली (प्रतिनिधी):** आयसीसी महिला टी-२० विश्वचषकात शनिवारी (२७ जून) न्यूझीलंड महिला क्रिकेट संघासाठी अत्यंत भावनिक क्षण अनुभवायला मिळाला. इंग्लंडविरुद्धच्या पराभवानंतर गतविजेत्या न्यूझीलंडचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. मात्र, या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले ते संघातील तीन दिग्गज खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटला दिलेला निरोप. सामन्यानंतर सूझी बेट्स, सोफी डिवाइन आणि ली ताहुहू या तिन्ही खेळाडूंना इंग्लंड आणि न्यूझीलंडच्या खेळाडूंनी 'गार्ड ऑफ ऑनर' देत सन्मानित केले. हा भावनिक क्षण पाहण्यासाठी तब्बल २१,०१८ प्रेक्षक मैदानावर उपस्थित होते. महिला टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील ही विक्रमी प्रेक्षकसंख्या ठरली. दिग्गजांची उल्लेखनीय कारकीर्द सूझी बेट्स यांनी न्यूझीलंडच्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी महिला क्रिकेटपटूंपैकी एक म्हणून कारकीर्द संपवली. त्यांनी ३७० आंतरराष्ट्रीय सामने खेळत १०,७२१ धावा केल्या आणि अनेक विक्रम आपल्या नावावर केले. सोफी डिवाइन यांनी जवळपास २० वर्षांच्या कारकिर्दीत ३१७ सामने खेळले. त्यांनी वनडेमध्ये ४,२७९ धावा आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३,८१७ धावा करत अनेक संस्मरणीय विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. अनुभवी वेगवान गोलंदाज ली ताहुहू यांनीही या सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करत आपल्या यशस्वी कारकिर्दीचा समारोप केला. गतविजेता म्हणून स्पर्धेत उतरलेल्या न्यूझीलंडला यंदा अपेक्षित यश मिळाले नसले, तरी या तीन दिग्गजांच्या निवृत्तीने महिला क्रिकेटमधील एका सुवर्णयुगाचा अंत झाल्याची भावना क्रिकेटविश्वातून व्यक्त होत आहे.

# आ. किशोरआप्पा पाटीलांच्या नेतृत्वावर विश्वास

जन सम्राट टाईम्स



**भडगाव । प्रतिनिधी :** भडगाव मतदारसंघात झालेल्या विकासकामांमुळे आणि कार्यसम्राट आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या जनहिताभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजप युवा मोर्चाचे उपजिल्हाध्यक्ष विकास महाजन तसेच नरेंद्र सूर्यवंशी यांनी शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दोन्ही कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. यावेळी नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी मतदारसंघातील विकासकामे, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत आमदार किशोरआप्पा पाटील यांनी घेतलेली भूमिका आणि जनतेशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क यामुळे प्रेरित होऊन शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. मतदारसंघातील रस्ते, पाणीपुरवठा, विविध विकास प्रकल्प तसेच नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे तरुणांमध्ये आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या नेतृत्वाबद्दल विश्वास निर्माण झाला असून विकासाच्या प्रवाहात सहभागी होण्यासाठी शिवसेनेत प्रवेश केल्याची भावना नव्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. या पक्षप्रवेश कार्यक्रमास गटनेते लखीचंद पाटील, नगरसेवक जितेंद्र आचारी, सुधाकर पाटील, महेंद्र ततार, रविंद्र पाटील, नितीन महाजन, सचिन पाटील, कुणाल पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे भडगाव शहर व परिसरातील शिवसेना संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असून, आगामी काळात आणखी काही कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचेही बोलले जात आहे. कार्यक्रमाच्या शेवटी "विकासाच्या विचाराला साथ, किशोरआप्पांच्या नेतृत्वावर विश्वास" या घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि नव्या कार्यकर्त्यांचे शिवसेना परिवारात उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

# सीट न मिळाल्याच्या रागातून रेल्वे टीटीईवर प्राणघातक हल्ला

## भुसावळ रेल्वे स्थानकावरील घटना

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** भुसावळ रेल्वे स्थानकावर ड्युटीवर असलेल्या रेल्वेच्या टीटीईवर एका प्रवाशाने प्राणघातक हल्ला केल्याची गंभीर घटना शनिवारी (२७ जून) रात्री घडली. एसी कोचमध्ये जागा उपलब्ध नसल्याचे सांगितल्याचा राग मनात धरून आरोपीने टीटीईला शिवीगाळ करत मारहाण केली. या हल्ल्यात टीटीईच्या डोळ्याखाली गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला असून सरकारी टॅब, चष्मा, ईएफटी बुक आणि सोन्याची साखळी यासह सुमारे ₹88 हजारांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. लोहमार्ग पोलिसांनी या प्रकरणी मनीष लक्ष्मणदास शंभानी (वय 36, रा. सिंधी कॉलनी, भुसावळ) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत विविध गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चुन्नीलाल रमेशचंद्र गुप्ता (वय 49) हे भुसावळ येथे हेड टीटीई म्हणून कार्यरत असून शनिवारी रात्री नागपूर–मडगाव एक्सप्रेस (गाडी क्र. 11203) मध्ये भुसावळ ते पनवेल दरम्यान एसी कोच तपासणीची ड्युटी बजावत होते. रात्री सुमारे 10.20 वाजता गाडी भुसावळ रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 3 वर आल्यानंतर आरोपीने एसी कोचमध्ये जागा देण्याची मागणी केली. मात्र, गाडीत आरएसी प्रवासी असल्याने जागा उपलब्ध नसल्याचे टीटीईने सांगितले. याचा राग आल्याने आरोपीने प्रथम अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर टीटीई दुसऱ्या प्रवाशाशी बोलत असताना अचानक त्यांच्या छातीवर, बरगड्यांवर तसेच चेहऱ्यावर हल्ला केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बल (RPF) जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले आणि त्यानंतर लोहमार्ग पोलिसांच्या स्वाधीन केले. या प्रकरणी भुसावळ लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 448/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 132, 352, 351(2), 115(2) आणि 324(4) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार धनराज सुधाकर लुले करीत आहेत.

### कोचमध्ये जागा देण्याची मागणी

लोहमार्ग पोलिसांनी या प्रकरणी मनीष लक्ष्मणदास शंभानी (वय 36, रा. सिंधी कॉलनी, भुसावळ) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत विविध गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चुन्नीलाल रमेशचंद्र गुप्ता (वय 49) हे भुसावळ येथे हेड टीटीई म्हणून कार्यरत असून शनिवारी रात्री नागपूर–मडगाव एक्सप्रेस (गाडी क्र. 11203) मध्ये भुसावळ ते पनवेल दरम्यान एसी कोच तपासणीची ड्युटी बजावत होते. रात्री सुमारे 10.20 वाजता गाडी भुसावळ रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 3 वर आल्यानंतर आरोपीने एसी कोचमध्ये जागा देण्याची मागणी केली. मात्र, गाडीत आरएसी प्रवासी असल्याने जागा उपलब्ध नसल्याचे टीटीईने सांगितले.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# मृतदेहांची वाहतूक घंटा गाडीत, माणसांची अवस्था कचऱ्यापेक्षा वाईट

## अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र वाहनातून विल्हेवाट लावण्याची आवश्यकता

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर जळगाव । प्रतिनिधी:** एखाद्या शहराची ओळख केवळ रस्ते, इमारती किंवा विकासकामांवरून होत नाही, तर तेथील प्रशासन जिवंत आणि मृत नागरिकांशी किती सन्मानाने वागते? यावरूनही ठरते. मात्र अमळनेर शहरात गेल्या काही दिवसांत समोर आलेल्या घटनांनी नगरपरिषदेच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, शहराच्या हद्दीत मृतावस्थेत आढळलेल्या बेवारस प्रेताची शवविच्छेदनानंतर अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र वाहनातून विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे. हे काम कचरा संकलन करणाऱ्या ठेकेदाराला बंधनकारक असताना देखील एक बेवारस प्रेताची ग्रामीण रुग्णालयातून विल्हेवाट लावताना चक्क कचरा वाहणाऱ्या घंटा गाडीतून वाहून नेण्यात आल्याचा असंवेदनशील प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मृत्यूनंतरही माणसाच्या सन्मानाची अशी पायमल्ली होत असेल तर ही केवळ प्रशासकीय अथवा ठेकेदाराची चूक नसून मानवतेलाच काळिमा फासणारी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. नगरसेवकांचा गंभीर आरोप या घटनेपूर्वी देखील अमरधाम स्मशानभूमीतील विदारक वास्तवही समोर आले होते. प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका शोभाबाई गढरे, राष्ट्रवादी युवकचे शहर अध्यक्ष दुर्गेश पाटील यांनी केलेल्या आरोपांनुसार, अंत्यसंस्कारासाठी पुरेसे सरण अनेक मृतदेह पूर्णपणे जळत नाहीत. परिणामी अर्धवट जळालेल्या अवशेषांची भटक्या कुत्र्यांकडून लचके तोडून विटंबना होत असल्याचे प्रकार वारंवार घडत होता. याशिवाय स्मशानभूमीत कायमस्वरूपी कर्मचारी नसल्याने दुःखाच्या प्रसंगी आलेल्या नातेवाईकांनाच सर्व व्यवस्था स्वतः करावी लागत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली होती.

शहरातील जलकुंभाची अस्वच्छता दरम्यानच्या काळात, शहरातील पाणी पुरवठ्याबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांनी स्वतः जलकुंभात उतरून पाहणी केल्यानंतर गेल्या 22 ते 24 वर्षांपासून जलकुंभाची स्वच्छता झाली नसल्याचा दावा केला. टाक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे शहरात दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशीही मोठा खेळ झाल्याचा आरोप होत आहे. या तीनही घटना एकत्र पाहिल्यास एक गंभीर चित्र समोर येते. जिवंत असताना नागरिकांना स्वच्छ पाणी मिळत नाही, मृत्यूनंतर सन्मानाने अंत्यसंस्काराची हमी नाही आणि स्मशानभूमीतही मूलभूत सुविधा नाहीत. त्यामुळे नगरपरिषदेच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नागरिकांकडून प्रश्न उपस्थित नागरिकांना पडलेला प्रश्न आहे .

### प्रशासनाची आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी

शहराच्या विकासाच्या घोषणा करणारे प्रशासन माणसाच्या जगण्याचा आणि मृत्यूनंतरच्या सन्मानाचाही विचार करणार आहे का? मात्र, कचरा वाहणाऱ्या घंटा गाडीतून मृतदेह नेल्याच्या घटनेबाबत संबंधित प्रशासनाने अधिकृत स्पष्टीकरण दिल्यास किंवा चौकशीत वेगळे निष्कर्ष समोर आल्यास तेही तितक्याच ठळकपणे जनतेसमोर मांडले जाणे आवश्यक आहे. अशा संवेदनशील प्रकरणात वस्तुस्थिती स्पष्ट करणे ही प्रशासनाची आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306